# तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

३, महापालिका मार्ग, पत्रपेटी क्रमांक १९६७, मुंबई - ४०० ००१.
दुरध्वनी - २२६२०६०१, २२६९०६०२, २२६४११५०/५१ फॅक्स २२६९०००७
तार EDUTECE-Mail :- 1) System@dte.org.in 2) Desk15@dte.org.in


क्र:१५/तंशिसं/अर्थस/ईबीसी-मुल्यांकन-दर्जा-२०१६/३२
दिनांक : 24 MAY 2016

प्रति,
१. मा. कुलगुरु/कुलसचिव,
सर्व शासकीय व खाजगी विद्यापीठ.

२. प्राचार्य,
खाजगी विनाअनुदानित महाविद्यालये/
तंत्रनिकेतने आणि शासकीय व अनुदानित महाविद्यालये/
तंत्रनिकेतने.

विषय : -शैक्षणिक वर्ष २०१५-१६ मध्ये प्रवेश घेतलेल्या आर्थिक मागासवर्गीय विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक शुल्क प्रतिपूर्ती योजनेच्या अंमलबजावणीबाबत...
(खाजगी विनाअनुदानित महाविद्यालये/तंत्रनिकेतनासमवेत शासकीय व अनुदानीत महाविद्यालये/तंत्रनिकेतने आणि शासकीय विद्यापीठातील विनाअनुदानीत तत्वावर चालविल्या जाणाया व्यवसायिक अभ्यासक्रमाला प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक शुल्काच्या ५० टक्के प्रतिपूर्ती बाबत).

संदर्भ :- शासन निर्णय क्र. टीईएम/प्र.क्र.२१९/तांशि-४,दि. ३१ मार्च. २०१६.

महोदय,

उपरोक्त विषयाबाबत असे नमूद करण्यांत येते की, संस्थेच्या शैक्षणिक शुल्काच्या ५० टक्के शिक्षण शुल्क प्रतिपूर्ती योजना ही खाजगी विनाअनुदानित महाविद्यालये/तंत्रनिकेतने आणि शासकीय व अनुदानित महाविद्यालये/तंत्रनिकेतने आणि शासकीय विद्यापीठातील विनाअनुदानित तत्वावर चालविल्या जाणा-या व्यावसायिक अभ्यासक्रमांना केन्द्रीभूत प्रवेश प्रक्रियमार्फत प्रवेश घेणा-या आर्थिक दृष्टया दुर्बल घटकातील विद्यार्थ्यांना शैक्षणिक वर्ष २०१५-१६ पासून लागू करण्यांत येत आहे.

खाजगी विनाअनुदानित महाविद्यालये/तंत्रनिकेतने आणि शासकीय व अनुदानित महाविद्यालये/तंत्रनिकेतने आणि शासकीय विद्यापीठातील विनाअनुदानित तत्वावर चालविल्या जाणा-या व्यावसायिक

महत्वाचे
शिक्षण
संकेतस्थळावर प्रसिद्ध करावे. सर्व शासकीय संस्थांना ईमेल करावे.
24.5




2975 25/5/16

अभ्यासक्रमांना अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद, नवी दिल्ली यांच्या कडून मान्यता तसेच सदरहू अभ्यासक्रमास शासन निर्णय व तंत्रशिक्षण संचालनालयाचे अंतिम मान्यता पत्र असणे आवश्यक आहे. या सर्व पत्रांची व शासन निर्णयाची पूर्तता ज्या संस्था, विद्यापीठ करतात व शासनाच्या केन्द्रीभूत प्रवेश प्रक्रियेत भाग घेतात, अशा सर्व संस्थातील केन्द्रीभूत प्रवेश प्रक्रियेमार्फत प्रवेश दिलेल्या आर्थिक दृष्टया दुर्बल घटकातील विद्यार्थ्यांना संदर्भाकिंत शासन निर्णयाअन्वये संस्थेच्या शैक्षणिक शुल्काच्या ५० टक्के प्रतिपूर्ती रक्कम सहसचांलक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, यांच्याकडून संस्थांना वितरीत केली जाणार आहे.

खाजगी विनाअनुदानित महाविद्यालये/तंत्रनिकेतने आणि शासकीय व अनुदानित महाविद्यालये/ तंत्रनिकेतने आणि शासकीय विद्यापीठातील विनाअनुदानित तत्वावर चालविल्या जाणा-या व्यावसायिक अभ्यासक्रमांना ३ (तीन) वर्षाच्या आत संबंधीत शैक्षणिक संस्थांनी, महाविद्यालयांनी व विद्यापीठानी शैक्षणिक वर्ष २०१८-१९ पर्यत सक्षम शिखर संस्थेकडून मूल्याकंन व दर्जा **(Assesment & Accreditation)** प्राप्त करणे आवश्यक आहे. त्यानुसार शैक्षणिक वर्ष २०१९-२० पासून संबंधीत शिखर संस्थेकडून मूल्याकंन व दर्जा **(Assesment & Accreditation)** निश्चित करुन मुल्याकंन व दर्जा प्राप्त न केल्यास अशा संस्थांना मुल्याकंन व दर्जा मानांकन **(Assesment & Accreditation)** प्राप्त होई पर्यंत या योजनेतून वगळण्यात येईल व त्या वर्षापासून केवळ मानांकन प्राप्त करण्या-या अशा संस्थेत केन्द्रीभूत प्रवेश प्रक्रियमार्फत प्रवेश घेतलेल्या फक्त प्रथम वर्षाच्या विद्यार्थ्यांना सदरहू योजना लागू राहील. बाकीच्या वर्षाच्या विद्यार्थ्यांना सदर योजनेचा लाभ मिळणार नाही.

म्हणून संस्था, महाविद्यालय व विद्यापीठ यांच्या मार्फत चालविल्या जाणा-या व तंत्रशिक्षण संचालनालयाशी संबंधीत असणा-या अभ्यासक्रमांना ३ वर्षाच्या आत सक्षम शिखर संस्थेकडून मूल्याकंन व दर्जा मानांकन **(Assesment & Accreditation)** प्राप्त करुन घ्यावेत तसेच संचालनालयास कळविण्यांत यावे.

आपला,

( डॉ. सुभाष महाजन )
संचालक,
तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

प्रत :- १. सर्व सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय यांना कळविण्यांत येते की, आपल्या अतंर्गत येणा-या संस्था, महाविद्यालय व विद्यापीठ यांच्या मार्फत चालविल्या जाणा-या व तंत्रशिक्षण संचालनालयाशी संबंधीत असणा-या अभ्यासक्रमांस सक्षम शिखर संस्थेकडून मूल्याकंन व दर्जा मानांकन (Assesment & Accreditation) प्राप्त करुन घ्यावेत याबाबत संस्थांना आपल्या स्तरावरुन सूचना देण्यात याव्यात.

२. कार्यासन अधिकारी, कार्यासन क्रमांक २, २-अ व १० मुख्य कार्यालय, मुंबई यांना माहिती व पुढील

पृष्ठांकन क्र.-विकाअ/शिक्षण/मुल्यांकन व दर्जा/२०१६/ 2115
सहसंचालक, तंत्रशिक्षण वि.का.अमरावती.
दिनांक 26 MAY 2016

प्र. सहसंचालक तंत्रशिक्षण
अमरावती.

प्रत :-

१) प्राचार्य, सर्व शासकीय/अनुदानित/विना-अनुदानित - पदवी, पदविका व पदव्युत्तर पदवी संस्था यांना कळविण्यात येते की, वरील पत्राच्या अनुषंगाने आवश्यक कार्यवाही करुन अहवाल या कार्यालयास सादर करावा.